मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in
इ-पत्ता **rmvs_mumbai@yahoo.com** , bmay2526.rmvs3gmail.com

# आवाहन

## 'मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे' उपक्रम सन २०२५ - २६

मराठी भाषेचा प्रचार प्रसार करणाऱ्या महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर परंतु देशांतर्गत मान्यता प्राप्त मराठी भाषा युवक मंडळांना अर्थसाहाय्य करणे हा उपक्रम राज्य मराठी विकास संस्थेमार्फत सन २०२४ पासून राबविण्यात येत आहे.

शासनामार्फत शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२३/प्र.क्र.२७/भाषा – ३, दि. १३ जुलै, २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासननिर्णयातील अटी-शर्तीना अनुसरुन पात्र मराठी भाषा युवक मंडळांना वार्षिक रु. १०,०००/- इतके अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी पात्र मराठी भाषा युवक मंडळांकडून दिनांक ०१/०१/२०२६ ते २०/०१/२०२६ या विहित कालावधीत व विहित नमुन्यात गुगल अर्ज मागविण्यात येत आहेत. या उपक्रमासंदर्भातील कार्यपद्धती व निकष, मराठी युवक मंडळे यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना, इतर तपशील विहित नमुन्यात गुगल अर्ज (Google Form) राज्य मराठी विकास संस्थेच्या https://rmvs.marathi.gov.in या व महाराष्ट्र शासनाच्या http://maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळांवर 'नवीन संदेश' या **सदरात 'मराठी भाषा युवक मराठी मंडळे स्थापन करणे' २०२५-२६** या शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आले आहेत

सदर अर्थसाहाय्याचे गुगल अर्जच्या (Google Form) विहित नमुन्यात व विहित कालावधीत दि. ०१/०१/२०२६ ते २०/०१/२०२६ पर्यत राज्य मराठी विकास संस्थेकडे सादर करणे बंधनकारक राहील. अंतिम तारखेच्या कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार हे या युवक मंडळांचे मुख्य ध्येय असले तरी या मंडळांमध्ये अमराठी भाषक बांधवांनीही योगदान देणे अभिप्रेत आहे.

महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर परंतु देशांतर्गत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मराठी भाषा युवक मंडळांना सदर उपक्रम/योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन राज्य मराठी विकास संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

# ‘मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे उपक्रम’ - सन २०२५-२६
## कार्यपद्धती, निकष व अटी-शर्ती

**प्रस्तावना :-**

मराठी भाषा विभागामार्फत दि. १३.०७.२०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासननिर्णयान्वये मराठीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी ‘मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे’ हा उपक्रम राज्य मराठी विकास संस्थेतर्फे सन २०२४ पासून कार्यान्वित करण्यात आला आहे.

मराठी भाषेचा प्रचार प्रसार करणाऱ्या महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर परंतु देशांतर्गत मान्यता प्राप्त मराठी भाषा युवक मंडळांना सदर शासननिर्णयातील अटी-शर्तींना अनुसरुन पात्र मराठी युवक मंडळांना वार्षिक रु. १०,०००/- इतके अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे.

**सदर उपक्रमाच्या कार्यपद्धती व निकष :-**

सदर शासननिर्णायान्वये मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करणाऱ्या महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर परंतु देशांतर्गत अशा मराठी भाषा युवक मंडळांना सदर उपक्रमातंर्गत राज्य मराठी विकास संस्थेमार्फत अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील तथा महाराष्ट्राबाहेरील परंतु देशांतर्गत मराठी भाषा युवक मंडळे नोंदणीकृत असावीत.

सदर उपक्रमाची वृत्तपत्रांतून जाहिरात प्रसिद्ध करण्यात येईल. गुगल अर्जाद्वारे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी निवड समिती गठीत करुन समिती सदस्यांची एक बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकीत गुगल अर्जाद्वारे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन त्याचे इतिवृत्त संस्थेच्या प्रकल्प वित्त आणि कार्यकारी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. कार्यकारी समितीने दिलेल्या निर्देशानुसार निवड झालेल्या मंडळांना पहिला टप्पा म्हणून मंजूर रक्कमेपैकी ६० टक्के अनुदान साहाय्याची रक्कम वितरित केली जाईल.

**मराठी भाषा युवक मंडळांकडून खालील प्रमाणे कार्यक्रम/उपक्रम करणे आवश्यक राहील:-**

१. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणे.
२. मराठी भाषा गौरव दिन साजरा करणे.
३. वाचन प्ररेणा दिन साजरा करणे.
४. मराठी साहित्याची आवड निर्माण होण्याच्या अनुषंगाने त्या त्या राज्यातील नामवंत साहित्यिक, विचारवंत, कवी, प्रकाशकांचा परिसंवाद/चर्चासत्र/व्याख्याने आयोजित करणे.
५. मराठी भाषा, साहित्य, संस्कृती व देवनागरी लिपीचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करणे.
६. मराठी भाषा विषयक प्रशिक्षण कार्यशाळा, स्पर्धा परीक्षांचे आयोजन करावे.
७. मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी अभिनव कल्पनेद्वारे कार्यक्रम आयोजित करणे.

**अनुदान / आर्थिक साहाय्याचे टप्पे व अटी-शर्ती :-**

१. महाराष्ट्रातील तथा महाराष्ट्राबाहेरील परंतु देशांतर्गत मराठी भाषा युवक मंडळे नोंदणीकृत असावीत.

२. राज्य मराठी विकास संस्थेच्या नियोजनानुसार या उपक्रमाची जाहिरात देऊन गुगल फार्म अर्जाद्वारे अर्ज मागवण्याचा दिनांक व कालावधी यात बदल करण्याचे अधिकार संस्थेला असतील. सदर जाहिरात/ निवेदन व गुगल अर्ज राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग तसेच महाराष्ट्र शासन यांच्या संकेतस्थळांवरही प्रसिद्ध करण्यात येईल. विहित कालमर्यादेनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा अर्थसाहाय्यासाठी विचार केला जाणार नाही,

३. महाराष्ट्रातील तथा महाराष्ट्राबाहेरील परंतु देशाअंतर्गत कार्यरत असणारी ही मराठी भाषा युवक मंडळे, नोंदणी अधिनियम, १८६० आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत धर्मादाय आयुक्तांकडे, तसेच सोसायटी कायदा व कंपनी कायदा कलम ८ अन्वये संबंधित प्राधिकरण अथवा विभागाकडे नोंदणीकृत असाव्यात. मालकी हक्काने चालविण्यात येणारी मंडळे अर्थसाहाय्यास/ अनुदानास पात्र असणार नाहीत.

४. मराठी भाषा युवक मंडळातील सभासदांची वयोमर्यादा ही १८ ते ४० इतकी असणे बंधनकारक आहे.

५. ज्या अर्जदार पात्र मंडळांना या योजनेअंतर्गत रु. १०,०००/- इतके अर्थसाहाय्य मंजूर करण्यात येईल, ती अनुदानित रक्कम एकाच वेळी १०० टक्के वितरित केली जाणार नाही तर त्या अनुदानित रकमेचे दोन टप्प्यात (मंजूरीनंतर ६० टक्के व उपक्रम पार पडून संबंधित संस्था / मंडळ यांनी उपक्रमांशी संबंधित सर्व कागदपत्रे राज्य मराठी विकास संस्थेस सादर केल्यानंतर शेवटी ४० टक्के) वितरण व्ही.पी.डी.ए प्रणालीद्वारे सदर मंडळे यांच्या बँक खात्यात केले जाईल.

६. राज्य मराठी विकास संस्थेच्या निकषांनुसार ज्या अर्जदार मंडळांना या योजनेअंतर्गत रु. १०,०००/- रुपयांच्या मर्यादेत, जे अर्थसाहाय्य मंजूर करण्यात येईल त्यासंदर्भातील राज्य मराठी विकास संस्थेचे अधिकृत पत्र, इ पत्रांच्या दिनांकानंतर संबंधित उपक्रम करणे बंधनकारक असेल. अधिकृत पत्र प्राप्त होण्याच्या आधी केलेले उपक्रम अर्थसाहाय्यासाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत.

७. पात्र मंडळास ज्या उपक्रमासाठी अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले आहे, त्या उपक्रम / कार्यक्रमाच्या सर्व साहित्यावर “या उपक्रमास राज्य मराठी विकास संस्थेतर्फे ‘मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे’ या अंतर्गत अर्थसाहाय्य प्राप्त झाले आहे.” असा स्पष्ट उल्लेख राज्य मराठी विकास संस्थेच्या मुद्रेसह (Logoसह) असण बंधनकारक आहे.

८. राज्य मराठी विकास संस्थेने ज्या कारणासाठी अर्थसाहाय्य वितरित केले त्याच कारणासाठी वापरणे बंधनकारक आहे. ते अन्य प्रयोजनासाठी खर्च करता येणार नाही, असे आढळून आल्यास ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल व अशा संस्था / मंडळां विरुद्ध गैरव्यवहाराची कारवाई करण्यात येईल.